2026 III 18 - 1100

२०२६ . ०३ . १८ - ११००

# N 970

Seat Number
बैठक क्रमांक

Time : 2 Hours
वेळ - २ तास

SOCIAL SCIENCES (73) GEOGRAPHY PAPER–II (M)

सामाजिक शास्त्रे (७३) भूगोल पेपर–२ (म)

(REVISED COURSE)

Pages - 7
पृष्ठे - ७

Total Marks : 40
एकूण गुण - ४०

---

सूचना :—

(1) *सर्व प्रश्न/कृती सोडविणे आवश्यक आहे.*

(2) *उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.*

(3) *प्रश्न क्रमांक 4(अ) साठी पुरविण्यात आलेल्या ब्राझील नकाशा आराखड्याचा वापर करून तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.*

(4) *प्रश्न क्रमांक 6(अ) साठी पुरविण्यात आलेल्या आलेख कागदाचा वापर करून ती पुरवणी मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावी.*

(5) *प्रश्नांची उत्तरे लिहितांना नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा आवश्यक तेथे वापर करण्यास परवानगी आहे.*

(6) *प्रश्नांची उत्तरे लिहितांना आवश्यक तेथे आकृत्या/आलेख काढावेत.*

(7) *प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनने लिहावीत. पेन्सिलने लिहिलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.*

(8) *आकृत्या, आलेख व नकाशा इत्यादी कार्य करण्यासाठी शिस पेन्सिल किंवा रंगीत पेन्सिल वापरण्यास हरकत नाही.*

**1. अचूक पर्याय निवडून विधाने पूर्ण लिहा :** **4**

(1) वाहतुकीचे सर्वात स्वस्त साधन .................................. आहे.

(*i*) रस्तेमार्ग

(*ii*) जलमार्ग

(*iii*) हवाईमार्ग

(*iv*) रेल्वेमार्ग

P.T.O.

(2) भारताच्या मध्यातून गेलेल्या ........................... पर्यंत सूर्य किरणे लंबरूप पडतात.

(*i*) विषुववृत्त

(*ii*) मकरवृत्त

(*iii*) कर्कवृत्त

(*iv*) रेखावृत्त

(3) ब्राझीलमधील ...................... वनांमुळे वातावरणात मोठ्या प्रमाणात प्राणवायू उपलब्ध होतो.

(*i*) पानझडी

(*ii*) काटेरी झुडपी

(*iii*) सदाहरित वर्षा

(*iv*) हिमालयीन

(4) भारताचे दरडोई उत्पन्न ब्राझीलपेक्षा कमी आहे, कारण ..........................

(*i*) कमी राष्ट्रीय उत्पन्न

(*ii*) प्रचंड लोकसंख्या

(*iii*) मोठे कुटुंब

(*iv*) अन्नधान्य कमतरता

**2. वेगळा घटक ओळखा :** **4**

(1) ब्राझीलमधील राज्ये :

(*i*) सावो पावलो

(*ii*) पाराना

(*iii*) बाहिया

(*iv*) उरुग्वे

(2) पठारी प्रदेश :

(*i*) महाराष्ट्र

(*ii*) पँटानल

(*iii*) कर्नाटक

(*iv*) तेलंगना

Seat Number
बैठक क्रमांक

(3) भारतातील जास्त पर्जन्याची ठिकाणे :

(*i*) मौसिनराम

(*ii*) चेरापुंजी

(*iii*) जैसलमेर

(*iv*) महाबळेश्वर

(4) ब्राझीलचे प्रमुख व्यापारी भागीदार :

(*i*) चीन

(*ii*) जर्मनी

(*iii*) अमेरिकेची संयुक्त संस्थाने

(*iv*) कॅनडा

**3. चूक की बरोबर सांगा (कोणतेही *चार*) : 4**

(1) नळदुर्ग किल्ला डोंगरी किल्ला आहे.

(2) ब्राझीलमध्ये जगातील सर्वाधिक वनस्पतींच्या प्रजाती आहेत.

(3) गोवा हे सर्वाधिक नागरीकरण झालेले राज्य नाही.

(4) ब्राझीलच्या आग्नेय किनाऱ्याजवळ मासेमारी व्यवसायाचे केंद्रीकरण झाले आहे.

(5) पर्यटन हा अदृश्य स्वरूपाचा व्यापार आहे.

**4. (अ) ब्राझीलच्या नकाशा आराखड्यात माहिती भरा व सूची तयार करा (कोणतेही *चार*) : 4**

(1) ब्राझीलमधील कोळसा उत्पादन क्षेत्र

(2) रिओ दी जनेरीओ

(3) ब्राझीलमधील काटेरी झुडपी वने

(4) विषुववृत्त

(5) पॅराग्वे नदी

(6) सर्वात कमी नागरी लोकसंख्येचे राज्य

# 4/N 970

(आ) खालील भारताच्या नकाशाचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही *चार*) : **4**




**प्रश्न :**

(1) भारतातील अती उत्तरेकडील सरोवराचे नाव लिहा.

(2) मध्य भारतातील प्रमुख पश्चिम वाहिनी नद्या कोणत्या ?

(3) कावेरी नदीचे उगमस्थान कुठे आहे ?

(4) मनास ही कोणत्या नदीची उपनदी आहे ?

(5) वरील नकाशा काय दर्शवितो ?

Seat Number
बैठक क्रमांक

**5. भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही *दोन*) : 6**

(1) ब्राझीलमध्ये नियमित हिमवर्षाव होत नाही.

(2) भारताच्या लोकसंख्येची सरासरी घनता जास्त आहे.

(3) पाण्याची उपलब्धता हा लोकवस्तीस चालना देणारा प्रमुख घटक आहे.

(4) भारत व ब्राझील या दोन्ही देशांमध्ये मिश्र अर्थव्यवस्था आहे.

**6. (अ) खालील सांख्यिकीय माहितीच्या आधारे रेषालेख तयार करा व खालील प्रश्नांची उत्तरे लिहा : 6**

**भारत—साक्षरता प्रमाण (टक्केवारी)**

| वर्ष | साक्षरता प्रमाण |
|---|---|
| 1981 | 40.8 |
| 1991 | 48.2 |
| 2001 | 61.0 |
| 2011 | 69.3 |

**प्रश्न :**

(1) 2011 साली साक्षरतेचे प्रमाण किती आहे ?

(2) 1991 ते 2001 या काळात साक्षरता किती टक्क्यांनी वाढली ?

(3) 40.8% साक्षरतेचे प्रमाण कोणत्या वर्षी होते ?

किंवा

(आ) खालील आलेखाचे वाचन करून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा : 6



Seat Number
बैठक क्रमांक

**प्रश्न :**

(1) वरील आलेखाचा प्रकार कोणता ?

(2) या आलेखात कोणत्या बाबी दाखविल्या आहेत ?

(3) कोणत्या देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पादनात पर्यटन व्यवसायाचे योगदान जास्त आहे ?

(4) भारतात पर्यटन व्यवसायात गुंतलेली लोकसंख्या किती टक्के आहे ?

(5) भारत व ब्राझीलमधील पर्यटन व्यवसायात गुंतलेल्या लोकसंख्येत किती टक्क्यांचा फरक आहे ?

(6) एकूण राष्ट्रीय उत्पादनाच्या तुलनेत पर्यटन व्यवसायात गुंतलेली लोकसंख्या जास्त असलेला देश कोणता ?

**7. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही *दोन*) :** **8**

(1) ब्राझील व भारताला कोणत्या पर्यावरणीय समस्यांना तोंड द्यावे लागते ?

(2) भारत व ब्राझील यांचा अक्षवृत्तीय व रेखावृत्तीय विस्तार सांगा.

(3) ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन करण्यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल ?